दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स
संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १८८ । मंगळवार १४ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## शहरासह जिल्ह्यात ‘जय भीम’चा गजर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती नगर शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध ठिकाणी बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मध्यरात्रीपासूनच जयंतीचा उत्साह ओसंडून वाहत आहे. सायंकाळी मिरवणूक निघणार असून, विविध कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे.

निळ्या रोषणाईने डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना सलाम करत अनुयायांकडून अभिवादन करण्यात आले. रात्री बाराचा ठोका पडताच ‘जय भीम’च्या घोषणांमध्ये फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. जयंतीनिमित्त ठिकठिकाणी भीमसैनिक एकवटल्याचे पाहायला मिळाले. सकाळपासून अनुयायांनी मार्केट यार्ड येथील पुतळ्यासह विविध ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन केले. प्रशासन व राजकीय नेते-कार्यकर्त्यांकडून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. पोलिसांच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सायंकाळी मिरवणूक निघणार असून, त्याची जय्यत तयारी सुरू आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रेल्वे स्टेशन शिवनेरी चौक येथील विजय गव्हाळे मित्र मंडळ व संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४ फुटी मूर्ती विराजमान करून आकर्षक विद्युत रोषणाई आणि सजावट करण्यात आली आहे.

## संविधानाच्या विचारांतून समाजाला दिशा - आमदार संग्राम जगताप

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्हा व मनपा प्रशासनाकडून अभिवादन**
**पोलीस बँड पथकाकडून मानवंदना; पूर्णाकृती पुतळ्याजवळ प्रथमच जयंती उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासन व महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस बँड पथकाकडून मानवंदना देण्यात आली.

अहिल्यानगर शहर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी समाज बांधवांकडून करण्यात आली होती. त्यानुसार पाठपुरावा करून या पुतळ्याचे काम पूर्ण करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयातील पुतळ्याच्या धर्तीवर उभारलेला हा पुतळा देशातील दुसरा असून शहरासाठी प्रेरणास्थान ठरत आहे. पूर्णाकृती पुतळा उभारणीनंतरची ही पहिलीच जयंती असल्याने कार्यक्रमाला विशेष उत्साह पाहिला



मिळत आहे भारतरत्न भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज शिकला पाहिजेत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की सांगितले की समाज शिकला ■ पान ४ वर

## भीमराव माझा झाला पहिला बॅरिस्टर; बौद्ध संस्कार संघाची भीमपहाट रंगली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बौद्ध संस्कार संघ परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भीमपहाट संगीत मैफिलीने छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील चेतना लॉन्स मंगल कार्यालय परिसर भीममय झाला. ‘नमो गौतमा’, ‘भीमा तुझं प्रणाम कोटी कोटी’, ‘अंगार विषमतेचा तुडवून भीम गेला’, ‘न घडणारे आमचे जीवन घडवून भीम गेला’, ‘राखिले कुळाचे नाव तू भीमराव’, ‘खरंच सांगतो भीमराव माझा झाला पहिला बॅरिस्टर’ अशा विविध भीमगीतांनी मंगळवारची पहाट उजळून निघाली.



डॉ. आंबेडकरांच्या जीवनचरित्रावर आधारित गीतांचे सुरेख सादरीकरण कलाकारांनी केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत या मैफिलीचा आनंद लुटला. बौद्ध संस्कार संघाच्या वतीने मागील १७ वर्षांपासून भीमजयंतीच्या दिवशी भीमगीतांची पहाट मैफल आयोजित केली जाते. यंदा १८व्या वर्षी ‘ऑर्केस्ट्रा संगीत सितारे’ परिवाराचे सुप्रसिद्ध निवेदक व गायक विनय कसबेकर यांच्या नेतृत्वाखाली विविध भीमगीते सादर करण्यात आली. ■ पान ४ वर



महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित येथीलॲड संजय कांबळे मित्रमंडळाच्या वतीने गेल्या १० वर्षानपासुन .एक आगळे वेगळे अभिवादन केले जात असुन यंदाच्याही वर्षी देखील १३५ पौंडाचा आकर्षक केक तयार करून मार्केटयार्ड जवळील डॉ. बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोर या केकचे कटींग करून उपस्थितांना वाटप करण्यात आले यासाठी राहूल पगारे, देवीदास पातोरे, रविंद्र पहेलवान, मिलिंद, हर्षवर्धन, व कृष पगारे, सुवाध, वसिम शेख, तारीक शेख यांनी परिश्रम घेतले. (छाया– अनिल शाह)





भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अहिल्यानगर शहरातून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे त्या निमित्ताने पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणवर तेनात करण्यात आला आहे तसेच मिरवणूक मार्गावर बॉम्ब शोधक पथकाच्या वतीने कसून तपासणी केली जात आहे ( छाया – राजू खरपुडे ,नगर)

## भारतीय बौद्ध महासभेच्या समता सैनिक दलाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास मानवंदना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय बौद्ध महासभेच्या समता सैनिक दलाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास मानवंदना देत जनरल सलामीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड व सचिव रवींद्र कांबळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर समता सैनिक दलाच्या वतीने जनरल सलामी देण्यात ■ पान ४ वर



## पारनेर दूध संघाला हायटेक झळाळी; अत्याधुनिक यंत्रणेसाठी एक कोटींचा निधी

**विखे पाटील यांच्या पुढाकाराने दूध संघाला संजीवनी । डॉ. सुजय विखे पाटील यांचा दूध संघाकडून सत्कार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** तालुक्यातील दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम आणि अत्याधुनिक करण्याच्या दृष्टीने पारनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाला मोठा आधार मिळाला आहे. राज्याचे महसूल व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे एक कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे दूध संघाच्या पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दूध संकलन आणि प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे.

मंजूर झालेल्या या भरीव निधीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दूध संघाच्या वतीने डॉ. सुजय विखे

> **विखे कुटुंबियांनी निधीच्या बाबतीत नेहमीच पारनेरला झुकते माप दिले आहे.मिळालेला निधी हा शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय आहे.आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्याने दूध संकलन व गुणवत्ता सुधारेल.**
> **-राहुल शिंदे,**
> **मंडलाध्यक्ष भाजपा**

पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते यांचेही संघाच्या वतीने आभार मानण्यात आले. या विकासकामांच्या माध्यमातून तालुक्यातील दुग्ध व्यवसायाला नवीन उभारी मिळणार असून, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

या निधीचा विनियोग प्रामुख्याने संघाच्या आधुनिकीकरणासाठी केला जाणार आहे. यामध्ये ८ नवीन बल्क मिल्क कुलर, अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त दूध तपासणी यंत्रे, अद्ययावत ■ पान ४ वर

## प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांचे स्वागत

**कौटुंबिक न्यायालय वकील संघाकडून सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे नव्याने बदली होऊन आलेले प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांचे कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभात न्यायाधीश कचरे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे यांच्या हस्ते न्यायाधीश कचरे यांचा सत्कार



करण्यात आला. कार्यक्रमाला संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, कार्याध्यक्ष ॲड. शिवाजी सांगळे, सचिव ॲड. राजेश कावरे, महिला सचिव ॲड. अनिता दिघे, माजी उपाध्यक्ष ॲड. आर. आर. शिर्के तसेच ॲड. वैभव कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनीही वकील संघाच्या स्वागताबद्दल आभार मानले. न्यायव्यवस्था अधिक सक्षम आणि जनतेसाठी न्याय सहज ■ पान ४ वर


## दै. आकर्षण निवडक

### क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानकडून अभिवादन



अहिल्यानगर - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर , विजय कोथिंबीर, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिकराव विधाते, प्रा. नितीन पुंड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजातील अन्याय, अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले आणि समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणाचा स्वीकार करून प्रगतीचा मार्ग धरावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे यांनी प्रास्ताविक करून महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन प्रा. नितीन पुंड यांनी केले, तर आभार प्रा. माणिकराव विधाते यांनी मानले.

### महानगरपालिका सहकारी पतसंस्थेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



अहिल्यानगर - महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, महाराष्ट्र राज्याला शाहू-फुले-आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळ उभी करून जनतेच्या हक्कांसाठी लढा उभारला. सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणून त्यांनी समाजातील प्रश्न सोडविण्याचे काम केले आणि समतेचा संदेश दिला.'आसूड' या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा मांडून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती सुरू करून त्यांच्या विचारांचा प्रसार समाजात केला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मुलींची पहिली शाळा सुरू करण्यासाठी दिलेल्या सहकार्यामुळेच महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम होण्याचा मार्ग खुला झाला, असे त्यांनी नमूद केले.यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चावरे म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार समाजामध्ये पोहोचविण्याचे कार्य पतसंस्थेच्या माध्यमातून पुढेही सातत्याने केले जाईल.या अभिवादन कार्यक्रमास व्हाईस चेअरमन कैलास चावरे, ज्ञुलाब गाडे, संचालिका प्रमिला पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा जयघोष करत त्यांना अभिवादन करण्यात आले.

### वसंतलाल चांदमल डागा यांचे निधन

अहिल्यानगर- येथील रिअल इस्टेट ब्रोकर प्रमोद डागा



यांचे वडील वसंतलाल चांदमल डागा यांचे सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ४ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. सोमवारी सायंकाळी त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. साधू संतांची सेवा करण्यात ते रममाण होत. सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या संचालिका सुवर्णा डागा यांचे ते सासरे होते. अशोकलाल, राजेंद्र, मूलचंद डागा यांचे ते काका होते.

## नाथषष्ठी महोत्सवात अभिनेत्रींचा जलवा; पैठण नगरीत भक्ती-नृत्याचा संगम!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** श्री क्षेत्र पैठण येथे संतश्रेष्ठ संत एकनाथ महाराज यांच्या ४२७ व्या षष्ठीनिमित्त आणि पावन वरुथिनी एकादशी पर्वानिमित्त आयोजित नाथषष्ठी सांस्कृतिक महोत्सवात भक्ती आणि सांस्कृतिक रंगत एकाच वेळी अनुभवायला मिळाली.

प्रा. राजेश सरकटे निर्मित ''गजर विठ्ठलाचा'' या कार्यक्रमाने वातावरण विठ्ठलनामात दंग केले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरेल सादरीकरणामुळे भाविक भक्तिरसात तल्लीन झाले.

या महोत्सवात विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांचा मनमोहक नृत्याविष्कार. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच ज्येष्ठ अभिनेत्री अलका कुबल यांची उपस्थितीही कार्यक्रमाला लाभली, ज्यामुळे सोहळ्याला अधिकच रंगत आली. यावेळी खासदार संदीपान भुमरे आणि आमदार विलास भुमरे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. मान्यवरांच्या उपस्थितीत आणि भाविकांच्या मोठ्या गर्दीत नाथषष्ठी महोत्सव उत्साहात पार पडला. एकूणच, पैठण नगरीत भक्ती, संस्कृती आणि मनोरंजनाचा संगम अनुभवायला मिळाल्याने हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## माथणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेस लोकसहभागातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होण्यासाठी लोकसभागातून या शाळेस पिण्याच्या पाण्यासाठी बॉस्को ग्रामीण विकास केंद्र ,केडगाव अहिल्यानगर यांच्यामार्फत ( मिशन आपुलकी अंतर्गत ) बोअरवेल मोटार ( विद्युत पंप ) सर्व संच, केबल ,रस्सी व पाईप आदि साहित्य ग्रामस्थांच्या हस्ते शाळेस भेट म्हणून देण्यात आले.

यासाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ,राहुल व्यवहारे ,उपसरपंच अशोक कांडेकर, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ शाळेत विद्यार्थ्यांना लोकसहभागातून हे साहित्य मिळवून दिले.शाळेत विद्यार्थ्यांसाठी लोकसहभागातून उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ,राहुल व्यवहारे यांनी विविध सुविधा निर्माण केलेल्या आहेत .यामुळे शाळेत विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची समस्या सुटलेली आहे.शाळेत लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी नेहमी विविध सुविधा मिळवण्यासाठी उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ हे प्रयत्नशील असतात.शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी लोकसहभागातून विद्यार्थ्यांना विविध भौतिक सुविधा मिळवून शाळेचा कायापालट केला आहे.याबद्दल विविध अधिकारी आणि ग्रामस्थ यांनी शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुलेंचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक - प्राध्यापक एकनाथ होले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री संत सावता महाराज मंदिरात सावता माळी तरुण मंडळ, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व ग्रामस्थांच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. सावता महाराज मंदिर परिसरात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबवून सावता महाराज मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर केला. सावता महाराज मंदिरात महात्मा फुले यांच्या प्रतिमेभोवती आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. या सजावटीने ग्रामस्थांचे विशेष लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रामपंचायत सदस्य संतोष चौरे यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक एकनाथ होले सर होते

''मुलगी वाचवा, मुलगी शिकवा'' हा संदेश समाजात प्रभावीपणे रुजवा. रुढी व परंपरांनी ग्रासलेल्या समाजात महिलांना मानाचे स्थान नव्हते, ''महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते विचारांचे क्रांतिकारक होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा अभ्यास करून समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा घ्यावी.'' महात्मा फुले यांचे विचार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांची भाषणे झाली. यावेळी माजी सरपंच संजय जपकर, माजी सरपंच अंबादास पुंड, माजी पंचायत समिती सदस्य किसन देवा होले, माजी सरपंच दिलीप होळकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष चौरे ,सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, प्राध्यापक एकनाथ होले, माजी उपसरपंच शिवाजी होळकर, जालिंदर शिंदे, समता परिषद अध्यक्ष शाहू होले, प्राध्यापक भाऊसाहेब पुंड, भानुदास फुले, ग्रामपंचायत सदस्य सोमानाथ पुंड, दत्तात्रय कदम, सबाजी कांडेकर, किसन कांडेकर, सोसायटी चेअरमन विलास जपकर, आकाश महाराज फुले, राजाराम जपकर, कानिफ कळमकर ,दिनेश भोळकर ,उमर सय्यद, सागर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते जमीर सय्यद, अनिल पवार, नानाभाऊ इंगोले, पोलीस पाटील अरुण होले, विनोद कदम व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भटके विमुक्त विकास परिषदेचे अभय जामगांवकर यांचा ७० वा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भटके विमुक्त विकास परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कोशप्रमुख अभय रघुनाथ जामगांवकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त 'भैमरथ शांती' सोहळा तसेच त्यांच्या पत्नी अनघा जामगांवकर यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त दुग्धशर्करा योग साधत हा सोहळा महालक्ष्मी सभागृहात उत्साहात पार पडला.

या निमित्ताने सकाळी भैमरथ शांती यज्ञ विधी पार पडला. मुख्य उपाध्ये संदीप सागडे व मनोज सागडे (राशीन देवी मंदिर) यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी संपन्न झाले. यावेळी जामगांवकर दांपत्याची गुळ व श्रीफळाने तुला करण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत जामगांवकर कुटुंबीयांनी भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानला देणगीही प्रदान केली.

कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पर्वती भागाचे माजी संघचालक ॲड. चंदूभाऊ कुलकर्णी, राजाभाऊ पानगवे, दर्शनजी मिरासदार, महेश दाबी, विश्वनाथ हेगडे, माधवराव खेडकर, प्रसादजी कांबळे आदींसह स्वयंसेवक उपस्थित होते.

## पैठण नगर परिषदेत अंधारात कारभार; प्रभाग १० मध्ये घाणीचे साम्राज्य नागरिकांचा संताप शिगेला!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरात नुकत्याच बसविण्यात आलेल्या नवीन वीज कनेक्शनमधून सुरू असलेल्या लाईट व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक ठिकाणी दिवस-रात्र लाईट सुरू ठेवले जात असून, काही भागात मात्र रात्रीच लाईट बंद असल्याने नागरिकांना अंधारात वावरावे लागत आहे.

या गंभीर प्रकाराबाबत संबंधित वार्डातील नगरसेवकांना माहिती देण्यात आली होती. नगरसेवकांनी तत्काळ संबंधित कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र गेल्या तीन दिवसांपासून फोन करूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे समोर आले आहे. अखेर ''कर्मचारी माझं ऐकत नाहीत, मी काय करू?'' अशी हतबल प्रतिक्रिया स्वतः नगरसेवकांनी नागरिकांसमोर व्यक्त केल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक १० मधील दारू सलाम वार्डात तर घाणीचे अक्षरशः साम्राज्य पसरले असून, स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी लाईट बंद,



काही ठिकाणी दिवसरात्र सुरू, तर काही भागात लाईटच नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरात एकीकडे दिवसभर लाईट सुरू ठेवून वीजेची उधळपट्टी होत असताना, दुसरीकडे काही भाग अंधारात असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत नगराध्यक्ष आणि मुख्य अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून दिवस-रात्र सुरू असलेले लाईट बंद करावेत तसेच ज्या ठिकाणी लाईट बंद आहेत, तेथे त्वरित सुरू करून स्वच्छतेसह मूलभूत सुविधा सुरळीत कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## राहुल आहेरचे यश इतरांना प्रेरणादायी - आमदार काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** म्हसोबा झाप ता. पारनेर येथील ग्रामस्थांच्या वतीने राहुल भानुदास आहेर व त्याचा बीड येथील सहकारी दिपक देवकर यांची पुणे शहर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य नागरी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या यशस्वी युवकांचा गौरव करताना परिसरातील तरुणाईसाठी हा प्रेरणादायी क्षण ठरला. या प्रसंगी सह्याद्री ॅकडमीचे संचालक गायकर सर, डुंबरे सर यांच्यासह बाळासाहेब गुंड, बाबुराव पवार, सोपान शेलार, अशोक खैरे, अन्सार पटेल, गोविंद आग्रे, भाऊसाहेब आहेर (सरपंच), बाबाजी दरेकर, रामदास दरेकर, सबाजी आहेर, मच्छिंद्र आहेर, तुकाराम आहेर, जयसिंग आग्रे, विठ्ठल आग्रे, बाबाजी आहेर, पोपट आहेर, भानुदास आहेर, बाळासाहेब आहेर, बबन आहेर, आण्णा आहेर, अशोक आहेर, संजय आहेर, कचरू खैरे, झुंबर दुधवडे, संपत मधे, काशिनाथ दुधवडे यांसह स्थानिक नागरिक व स्थानिक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दाते सर यांनी राहुल आहेर व दिपक देवकर यांचे तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे, नातेवाईकांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सह्याद्री ॅकडमीचे संचालक गायकर सर, डुंबरे सर यांचे विशेष अभिनंदन केले. ''आजच्या स्पर्धेच्या युगात सरकारी नोकऱ्यांच्या संधी मर्यादित असल्या तरी पोलीस खात्यासारख्या क्षेत्रात मिळालेलं यश हे मोठं यश आहे. पारनेर तालुका दुष्काळी असल्याने शिक्षण हाच आपल्या तरुणांसाठी खरा मार्ग आहे.''

''संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला असता पारनेर तालुक्यातील युवक विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्यरत असून शिक्षकांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत व्यवसाय करणाऱ्या पारनेरकरांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. सातत्याने भेडसावणारा दुष्काळ हा आपल्या जिद्दीला धार लावणारा ठरला असून हीच आपत्ती आपल्या प्रगतीची इष्टापत्ती ठरली आहे.''

या सत्कार समारंभाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, ''अशा कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. राहुलच्या यशाचा सन्मान होताना पाहून इथल्या तरुणांमध्येही प्रेरणा निर्माण होईल आणि तेही त्याच्या पावलावर पाऊल ठेवत यश संपादन करतील, असा मला विश्वास आहे.''

तसेच त्यांनी भूतकाळातील आठवणींना उजाळा देत सांगितले की, ''अलीकडच्या पिढीला फार माहित नसेलही कदाचित पण गेली चाळीस वर्ष राजकारणात - समाजकारणात काम करत असताना या भागात शिक्षणाच्या सुविधा मर्यादित होत्या, त्या निर्माण करण्यावर मी सातत्याने भर दिला. तत्कालीन आमदार स्व. वसंतराव झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पळसपूर, पोखरी, गुरेवाडी या भागांत सुरू केलेल्या शाळांचे आज हे यशस्वी फळ दिसत आहे, याचा मला अभिमान वाटतो.''

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार विजेत्या बेबीताई गायकवाड यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' मिळाल्याबद्दल श्री विशाल गणपती माळीवाडा देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी देवस्थानचे सचिव अशोक कानडे म्हणाले की, बेबीताई गायकवाड यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत समाजातील दुर्लक्षित महिलांच्या न्याय व हक्कांसाठी सातत्याने लढा



दिला आहे. त्यांनी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी पुढाकार घेत महिलांमध्ये जनजागृती केली. तसेच एकल महिलांच्या प्रश्नांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून त्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांना सन्मानित केले आहे. महिलांच्या प्रश्नांसाठी समाजामध्ये लोकचळवळ उभी करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सत्कार सोहळ्यास देवस्थानचे अध्यक्ष ॲडव्होकेट अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोक कानडे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर, ज्ञानेश्वर रासकर, विजय कोथिंबीर, नितीन पुंड, विष्णुकांत मस्के, प्रा. माणिकराव विधाते, रेणुका पुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना बेबीताई गायकवाड म्हणाल्या की, राज्य शासनाने माझ्या कार्याची दखल घेऊन मला 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' देऊन सन्मानित केले, याचा मला अभिमान आहे. तसेच शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आलेल्या सत्काराबद्दल मी आभारी आहे. श्री विशाल गणपतीच्या पावन भूमीत झालेल्या या सन्मानामुळे मला समाजकार्य करण्यासाठी नवी ऊर्जा मिळाली आहे. यामुळे समाजातील वंचित, गरजू व एकल महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिक बळ मिळेल, असे त्यांनी सांगितले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### के जी कला व वाणिज्य महाविद्यालय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



अहिल्यानगर- डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. त्यांनी समाजातील समानता, न्याय आणि बंधुता या मूल्यांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही समाजावर मोठ्या प्रमाणात आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ स्वाती मुनोत यांनी केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने कार्यालयीन अधिक्षक श्री संतोष मुनोत यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. वर्षा कीर्तने यांनी केले. यावेळी विद्यार्थी - विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ प्रशांत खोपटीकर यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. राहुल थोरात यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. चाकवते, हर्षाली रासकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कान्हूर पठारच्या निखिल शिंदे यांचे एमपीएससीत यश



अहिल्यानगर- कान्हूर पठार येथील निखिल नंदू शिंदे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत मंत्रालयातील महसूल सहाय्यक पदावर नियुक्ती मिळवली आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना त्यांनी अनेक आव्हानांचा सामना केला. कुटुंबीयांचे पाठबळ, स्वतःची मेहनत आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी अखेर यशाचा मुकुट आपल्या नावावर केला. निखिल शिंदे हे शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांचे बंधू आहेत. त्यांचे वडील नंदू शिंदे हे राज्य परिवहन मंडळ, पारनेर येथे कंडक्टर म्हणून कार्यरत होते. अत्यंत साध्या आणि कष्टकरी कुटुंबातून आलेल्या निखिल यांनी कोणत्याही प्रकारच्या अडचणींना न जुमानता जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. त्यांचे आजोबा भगवान शिंदे,आई मोहिनी शिंदे, चुलते सुनील शिंदे, सुभाष शिंदे, अमोल भोसले, आकाश शिंदे, मयूर शिंदे, अनिकेत शिंदे, किशोर शिंदे,, मीना शिंदे, सुजाता शिंदे, भाग्यश्री शिंदे, प्रीती शिंदे, हिराबाई शिंदे, हिंदवी शिंदे तसेच मित्रपरिवाराने त्यांचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### पारनेर तालुक्यात सामाजिक समता सप्ताह साजरा



अहिल्यानगर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या समतादूत प्रकल्पांतर्गत आणि समाजकल्याण विभागाच्या सहकार्याने पारनेर तालुक्यात सामाजिक समता सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा होत आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हा सप्ताह दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.सप्ताहाचा उद्घाटन सोहळा दि. ८ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व सामूहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करून संपन्न झाला. संपूर्ण सप्ताहात सामूहिक उद्देशिका वाचन, शासकीय योजनांबाबत जनजागृती, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन, विविध स्पर्धा, वयोवृद्ध नागरिकांसाठी आरोग्य शिबिर तसेच स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमाचे आयोजन समाजकल्याण आयुक्त तथा महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ, निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच सहायक आयुक्त प्रवीण कोरगटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून बार्टीचे प्रकल्प अधिकारी दिलावर सय्यद यांच्या नियोजनातून जिल्हाभर समतादूतांच्या माध्यमातून कार्यक्रम राबवले जात आहेत.

# भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी दिलेले संविधानच देशाचे अखंडत्व टिकवू शकते – किरण काळे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आज देशामध्ये परिस्थिती चिघळविण्याचा प्रयत्न काही लोक करीत आहेत. आपल्या राजकीय अजेंड्यासाठी देशाला अस्थिर करण्याचे डाव काही प्रवृत्ती राबवित आहेत. मात्र देशाला स्थिर, एकसंध ठेवण्याची ताकद देशाच्या संविधानामध्ये आहे. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधानच देशाचे अखंडत्व टिकवू शकते, असे प्रतिपादन अहिल्यानगर शिवसेना ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे. डॉ.आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन केल्यानंतर त्यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. यावेळी काळे यांच्यासह संजय झिंजे, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी, राम झिने, अलतमश जरीवाला, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, संतोष घरवाढवे, मतीन शेख, उषाताई भगत, शैलाताई लांडे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, अमोल खाडे, रामभाऊ धोत्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

किरण काळे पुढे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी ‘‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा‘‘ असा संदेश समाजाला दिला. शिक्षणाच्या बाबतीत आपण पुढे आलो आहोत. मात्र आज देशामध्ये ज्या पद्धतीने देश तोडण्याच्या कृती सुरू आहेत या कृतींच्या विरोधात लढण्यासाठी त्यांच्या विचारांप्रमाणे संघटित होऊन संघर्ष करण्यासाठी सज्ज होण्याची गरज आहे.

काही लोकांना देशाच संविधान नको आहे. त्यांना मनुस्मृति पुन्हा आणायची आहे. हे षडयंत्र रोखण्याचे काम आपल्याला संघटितपणे करावे लागेल. संविधानाचा जागर करण्याची पुन्हा एकदा वेळ आलेली आहे. शांततेचा विचार घेऊन समाज विघातक प्रवृत्तींपासून समाजाला वाचण्यासाठी काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी काळे यांनी केले.

## माळीवाडा येथे काळ भैरवनाथ मंदिर जीर्णोद्धार सोहळा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** माळीवाडा ब्राह्मण गल्ली येथील श्री काळ भैरवनाथ मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती स्थापनेचा सोहळा दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त मंदिरास स्टीलचा दरवाजा अर्पण करण्याचा उपक्रमही पार पडला.

कै. भागीरथाबाई बाबुराव लकशेट्टी यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू वरद गणेश लकशेट्टी यांनी मंदिरासाठी स्टीलचा दरवाजा अर्पण करून आदर्श उपक्रम राबविला. त्यांच्या या योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

यावेळी मंदिराचे अध्यक्ष चरण भाऊ परदेशी, उपाध्यक्ष मिलिंद काका लकशेट्टी यांच्यासह दत्ता शेठ लकशेट्टी ,सुनील जैन ,धनंजय कळमकर, रोहित कावळे, भाऊ उरणे, अमोल लकशेट्टी, सतीश तांबोळी, तुषार वाघ, विशाल जाधव, संतोष नन्नवरे, अमोल शेठ ठाकूर, महेश भाऊ चिंतामणी, कचरू परदेशी, महेंद्र लकशेट्टी, सागर कापसे, गणेश शेठ चिंतामणी, विनीत कावळे ,गौरव बुगे, अमित डोळसे साजिद शेख

रोहित सोनेकर संतोष लकशेट्टी चातुर परदेशीआदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष चरण भाऊ परदेशी व उपाध्यक्ष मिलिंद काका लकशेट्टी यांनी वरद लकशेट्टी यांचे मंदिरास दरवाजा अर्पण केल्याबद्दल आभार मानले. या उपक्रमामुळे परिसरात भक्तीभावाचे वातावरण निर्माण झाले असून, मंदिराच्या सुशोभीकरणाला नवी दिशा मिळाली आहे.

तसेच सर्व देणगीदार व हितचिंतकांचे या कार्यक्रमानिमित खूप खूप आभार आपल्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी झाला असे अध्यक्ष चरण भाऊ परदेशी यांनी सांगितले.

# मोफत दंतरोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सध्या रुग्णसेवा ही फार महागडी अशी व्यवस्था झालेली आहे.सर्वसामान्यांना परवडेल अशा प्रकारची चांगली वैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम प.पु.आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने होत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटल हे नगर शहरातीलच नव्हे. तर संपूर्ण महाराष्ट्राचे आरोग्यसेवेचे केंद्र बनले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स, नर्सेस व स्टाफ अत्यंत आपुलकीने रुग्णसेवा करीत आहेत.जैन सोशल फेडरेशनने शिबिराच्या माध्यमातून लोढा परिवाराला रुग्ण सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या पुढील काळात पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त शिबिर घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्या साठी लोढा परिवाराचे सदैव सहकार्य मिळेल. असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्वर्गीय हस्तीमलजी मूळचंदजी लोढा यांच्या स्मृतिदिनानिमित्त वसंत,पारस,पोपट लोढा व लोढा परिवाराच्या वतीने आयोजित मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा,उद्योजक पारस लोढा,सामाजिक कार्यकर्ते पोपट लोढा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष लता भाभी लोढा,शांतीलाल लोढा,संतोष लोढा,विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त अशोक कानडे,बबनराव गोरे,सुप्रिया लोढा,उषा लोढा,मीना लोढा,कोमल लोढा,जागृती लोढा,चैताली गोलेचा,अभय पुंगलिया,मनसुख संचेती,सौ.कीर्ती बोगावत,पवन बोगावात आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया,सतीश लोढा,माणकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी,पियुष मंडलेचा शिबिराचे तज्ञ डॉ.अर्पणा पवार,डॉ. स्वराज ढोले आदी उपस्थित होते.

अशोक कानडे म्हणाले,वसंत लोढा यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून गोरगरीब आणि गरजूंना नेहमीच मदत केली आहे.दीनदयाळ परिवाराच्या माध्यमातून समाज प्रबोधनही केले जाते.तसेच शहराच्या जडणघडणीत लोढा परिवाराचे योगदान सातत्याने लाभत आहे.आरोग्य शिबिराच्या माध्यमातून लोढा परिवाराने केलेले रुग्णसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,स्व.हस्तीमल लोढा यांनी केलेल्या संस्कारामुळे लोढा परिवार सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर आहे.काशी,बनारस येथे न जाता आई वडील हेच आपले चारीधाम आहे.असे समजून लोढा परिवाराने आई-वडिलांची सेवा केली आहे.वडिलांच्या स्मृतिदिनी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून रुग्णसेवेचे कार्य करुन स्मृति जपण्याचे कार्य लोढा परिवार करीत आहे.माजी नगराध्यक्ष लता भाभी लोढा यांनी शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.लोढा परीवारा सारखे दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल चे सेवा कार्य प्रगतीपथावर आहे. सामाजिक कार्यात लोढा परिवाराचे मोठे योगदान आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात वसंत लोढा,पारस लोढा,पोपट लोढा व लोढा परिवाराचे मोठे योगदान लाभले आहे.तसेच वर्धमान युनिव्हर्सिटी सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पालाही लोढा परिवाराने देणगीच्या माध्यमातून सहकार्य केले आहे.

## अध्यात्मिक प्रतिष्ठान वेद पाठशाळेतील विद्यार्थ्यांचा ‘वेदालंकार’ पदवीने सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणार्या पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे स्थित असलेल्या अध्यात्मिक प्रतिष्ठान वेद पाठशाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी अहिल्यानगरमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत वेदालंकार ही मानाची पदवी प्राप्त केली. या सन्मान सोहळ्यात अहिल्यानगरचे सुपुत्र परशुराम रेखी गुरुजी यांना वेदालंकार पदवीने गौरविण्यात आले.

मुखेड येथील आदित्य जोशी यांनाही वेदालंकार पदवीने गौरविण्यात आले. या कार्यक्रमात श्रीमत्



भागवत निरूपणकार वेदमूर्ती अशोकशास्त्री कुलकर्णी गुरुजी, वेदमूर्ती अतुलशास्त्री भगरे गुरुजी, वेदमूर्ती महेशजी रेखे गुरुजी तसेच दण्डक्रम पारायण करणारे वेदमूर्ती देवव्रत महेशजी रेखे गुरुजी उपस्थित होते.

## मखदुम सोसायटी तर्फे महात्मा फुले यांना अभिवादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतातील शिक्षण क्षेत्रात अत्यंत महत्वाची कामगिरी करणारे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीमाई फुले दाम्पत्य यांनी वेळोवेळी अहमदनगर शहरात भेट दिली, वास्तव्य केले. त्यात अहमदनगर मराठी मिशनच्या सिंधिया फेरार यांच्या क्लेरा ब्रुस कन्याशाळेत सावित्रीमाई फुले व फातिमा शेख या काही दिवस शिक्षिकेचे प्राथमिक शिक्षण घेतले होते. तर काही न्यायालयीन कामकाजासाठी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुल येथिल असलेले मेन हॉल कोर्टास भेट दिली होती. येथे त्यांचे मित्र सदाशिव विनायक गोवंडे कार्यरत होते.



महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले दांपत्याची प्रासंगिक भितीचित्रे महापालीकेने तयार करून या दोन ठिकाणी लावावी. जेणेकरुन येणाऱ्या पिढीला फुले दाम्पत्याचे शैक्षणिक योगदान स्मरणात राहील. अशी मागणी अहिल्यानगर इतिहासप्रेमी मंडळाचे कार्याध्यक्ष भैरवनाथ तुकाराम वाकळे यांनी केली. महात्मा ज्योतिबा फले जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व अहिल्यानगर इतिहासप्रेमी मंडळातर्फे महात्मा फुले यांच्या माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर इतिहासप्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, शब्बीर शेख, इंजि.अभिजित वाघ, संध्याताई मेढे, दत्ताभाऊ वडवणीकर, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, सय्यद शफकत, पंकज गुंदेचा, फिरोज शेख, संतोष गायकवाड, डॉ.नन्नवरे,एड. विधाताई,दिपक क्षीरसागर,तुषार सोनवणे, राजेंद्र कर्डिले, रविंद्र सातपुते आदी उपस्थित होते.

## वैदेही गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती पदवी प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया ज्युनिअर कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करणाऱ्या सौ.वैदेही वासुदेव गायकवाड (मोहिते)यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची ‘डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी’ अर्थात ‘विद्यावाचस्पती’ पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे.त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सौ.गायकवाड या पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्राच्या विद्यार्थिनी असून त्यांनी ‘‘महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांचा सांस्कृतिक अभ्यास’’ हा विषय संशोधनासाठी निवडला होता.या अभ्यासामध्ये त्यांनी विविध भक्ती संप्रदायांचा सखोल अभ्यास करून त्यांतील सामाजिक, आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचा अभ्यास मांडला आहे. तसेच ही मूल्ये सामान्य माणसाच्या जीवनात कशी रुजवता येतील आणि त्यातून सर्वांगीण विकास कसा साधता येईल, यावर त्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे.



या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रबंध मार्गदर्शक डॉ.वसंतराव शेंडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ माहेश्वरी गावीत यांचेही सहकार्य व मार्गदर्शन संशोधनात उपयुक्त ठरले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी तसेच सुमित्रा भालेराव यांनी सौ.गायकवाड यांचे अभिनंदन करून सत्कार केला.

सौ.वैदेही गायकवाड या ह.भ.प.चंद्रकांत महाराज मोहिते व सौ. पुष्पलता चंद्रकांत मोहिते यांच्या कन्या असून वैकुंठवासी श्री विनायकराव मार्तंडराव गायकवाड व वैकुंठवासी सौ. सुलोचना विनायक गायकवाड यांच्या त्या सून आहेत. त्यांच्या यशामागे त्यांचे पती वासुदेव विनायक गायकवाड यांचे भक्कम पाठबळ लाभले असून चिरंजीव वेदांत वासुदेव गायकवाड यांचाही त्यांना प्रेरणादायी सहवास मिळाला.

# शासनाच्या सर्व योजनेचा लाभ सर्व समाजातील जनतेला मिळाला पाहीजे – आमदार राजळे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार–** शासनाच्या अनेक योजना असून या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय अधिकारी,राजकीय पदाधिकारी यांनी प्रयत्न करायला हवे अशी अपेक्षा आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केली. तालुक्यातील खरवंडी कासार येथील भगवान विद्यालय येथे आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, नायब तहसीलदार किशोर सानप , दिगविजय पाटील व सर्व खात्याचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी श्री धनजंय बडे सौ काशीबाई गोल्हार वृद्धेश्वर चे संचालक बाळासाहेब गोल्हार कोळसांगवी सरपंच युवराज फुंदे मिडसांगवी सरपंच भगवान हजारे उपसरपंच विष्णु थोरात खरवंडी चे सरपंच प्रदिप पाटील भारजवाडी चे सरपंच माणिक बटुळे माजी शालेय व्यवस्थापन अध्यक्ष पंढरीनाथ ( पप्पु ) केकाण नितिन किर्तने किरण खेडकर सचीन गायकवाड वामन किर्तने रामहारी खेडकर अनिल जाधव संजय किर्तने आदि मान्यवर उपस्थित होते

यावेळी आ . राजळे म्हणाल्या ग्रामीण भागातील नागरिकांना विविध दाखले घेण्यासाठी पाथर्डी तहसील कार्यालयात



(छाया- सतिष जगताप )

यावे लागते मात्र एकदा येऊनही काम होईलच याची खात्री नसल्याने शासनाने हे शिबीर सुरु केले आहे. या योजनेचा लाभ मतदारसंघातील अनेक गावांना कसा भेटेल या साठी सर्वानी काम करणे गरजेचे आहे.

महसूल विभागाच्या सेवांना गावातच सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील अनेक मंडळात हा उपक्रम राबवला जात आहे.या उपक्रमात सहभागी होत महसूल विभागाशी निगडीत सेवांचा फायदा करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जमिनीचा ७/१२ दुरुस्ती, जात प्रमाणपत्र या सारखी महत्वपूर्ण कामे या शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत.राज्यातील जनतेच्या समस्या त्वरित व अगदी सुलभतेने सोडवण्यासाठी महायुती सरकार असे लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत आहे. शासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात पेन्डसी निर्माण झाली असल्याने ती कमी करण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे.तहसील कार्यालयात जनता दरबार भरवून समस्यांचा निपटारा लवकर होत नाही त्या ऐवजी महाराजस्व शिबीर आयोजित करून जनतेचे प्रश्न मार्गी लावता येतात.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण व समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला – संभाजी कदम

### अहिल्यानगर शिवसेनेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे. त्यांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा प्रामुख्याने विचार केला. शिक्षण व समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवकल्याणाचा विचार पुढे घेऊन जाणे, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन देशाचा विकास करणे, हे डॉ.बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन शहरप्रमुख संभाजी कदम यांनी केले.

अहिल्यानगर शिवसेनेच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्केट यार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहरप्रमुख संभाजी कदम ,गटनेते दत्तात्रय कावरे ,संजय शेंडगे, सचिन जाधव , सुरेखा कदम, शाम नळकांडे, दत्ता जाधव, सचिन शिंदे ,सुवर्णा जाधव ,संतोष गेणप्पा, संदीप दातरंगे ,काका शेळके ,सुरेश तिवारी ,परेश लोखंडे ,महिला जिल्हाध्यक्षा स्वाती जाधव ,अरुण झेंडे ,घनश्याम घोलप ,नलिनी गायकवाड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी कदम पुढे म्हणाले कि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे महामानव आपल्या देशात जन्माला आले आणि त्यांना देशाला जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना दिली, हे आपले भाग्य आहे. कायदेतज्ञ, घटनातज्ञ, अर्थतज्ञ, लेखक, पत्रकार, चित्रकार, संगीतकार असे बहुआयामी व्यक्तीमत्व होते. देशाच्या राजकारण, समाजाकारण, अर्थकरणाला आश्वासक दिशा देण्याचे काम त्यांनी केले, अशा शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलतांना गटनेते दत्तात्रय कावरे म्हणाले की, आज भारताचे संविधान लिहून सर्व समाजाला समान अधिकार देण्याचा प्रयत्न हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. त्यांनी केलेले वाचन, मांडलेले विचार, त्यावेळेस दिलेला लढा समाज परिवर्तनाची मोठी लढाई होती. त्यांनी लिहिलेले संविधान हे लोकशाहीचे सर्वात मोठे यश असल्याचे सांगितले.

# समर्थच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला ‘आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस’

### अमेरिकेच्या नासाच्या वतीने विद्यार्थ्यांना प्राप्त झाले बोर्डिंग पास व पासपोर्ट




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १२ एप्रिल १९६१ रोजी सोव्हिएत-रशियन अंतराळवीर युरी गागारिन यांनी व्होस्टोक १ या अंतराळयानातून पृथ्वीची पहिली प्रदक्षिणा पूर्ण केली होती.तसेच भारताच्या इस्त्रोच्या ‘‘गगनयान‘‘ या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेची दुसरी एकात्मिक हवाई चाचणी नुकतीच १० एप्रिल रोजी यशस्वी झाली तसेच नासाच्या आर्टीमिस-२ या उपक्रमाचे प्रक्षेपण व समुद्रातून पृथ्वीवरील पुनरागमन, तसेच इस्रोच्या गगनयानच्या मॉड्युल चाचणीचे लाईव्ह प्रात्यक्षिक शेकडो विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अनुभवले. नासाच्या उपक्रमाचे बोर्डिंग पास व पासपोर्ट विद्यार्थ्यांना प्राप्त झाले.

हे औचित्य साधत सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला,माध्यमिक विभागाच्या वतीने संयुक्त राष्ट्र महासभेच्या वतीने निर्धारित ‘‘आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस‘‘ साजरा करण्यात आला.याकामी स्पेस एज्युकेटर शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करत परिश्रम घेतले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश क्षीरसागर, प्राचार्या वसुधा जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांचे विशेष मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले.२ एप्रिल ते १२ एप्रिल या कालावधीतील नासाच्या आर्टीमिस-२ या ४ अंतराळवीरांच्या चांद्र मोहिमेच्या १० दिवसांचा प्रवास विद्यार्थ्यांना ऑनलाइन दाखवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

श्री.क्षीरसागर यांनी नमूद केले की ‘‘विद्यार्थ्यांच्या मनामध्ये मानवजातीच्या अंतराळ युगाच्या सुरुवातीचे स्मरण करणे,शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या योगदानाचा गौरव करणे आणि शांततापूर्ण हेतूंसाठी बाह्य अवकाशाचा वापर करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे. यासाठी हा उपक्रम विशेष महत्त्वाचा वाटतो.‘‘

विज्ञान शिक्षिका सौ.द्वारका खिलारी यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांनी सूर्यमालेची विविध शेकडो स्वयंचलित शैक्षणिक साहित्य साधने तयार करून उपक्रमात सहभाग घेतला.प्रास्ताविक प्राचार्या जोशी यांनी केले तर आभार पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी केले.



**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित मार्कटयार्ड जवळील पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करताना आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव,परिमल निकम, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेश बनसोडे, मयूर बांगरे, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, उपायुक्त मेहेर लहारे, माजी नगरसेवक मनीष साठे, प्रा. माणिकराव विधाते, जयंत गायकवाड, वाल्मीक कुलकर्णी, प्रिया जानवे, रेश्माताई आठरे, सविता मोरे आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया – अनिल शाह)**

# आर्ट ऑफ लिव्हिंगच्या इंट्युशन प्रोग्रामला उस्फूर्त प्रतिसाद; ८० विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था तर्फे उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या ‘‘इंट्युशन प्रोग्राम’’ (अंतर्ज्ञान प्रक्रिया शिबिर) ला शहरात उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सध्या सुरू असलेल्या या शिबिरात तब्बल ७० ते ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. ५ ते १८ वयोगटातील मुलांसाठी आयोजित हा उपक्रम पालक व विद्यार्थ्यांमध्ये विशेष आकर्षणाचा विषय ठरत आहे.

गावडे मळा येथील आर्ट ऑफ लिव्हिंग मुख्य केंद्र ज्ञान क्षेत्रात सुरू असलेल्या या शिबिरात साठी नगरच्या या शिबिरसाठी आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचे राज्य समन्वयक माधवजी गवळी, जळगाव व हरीशजी पाटील, नंदुरबार तसेच नगरचे स्थानिक प्रशिक्षक कृष्णाजी पेंडम अश्या अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवले जात आहेत. योग, प्राणायाम आणि सुदर्शन क्रिया यांच्या साहाय्याने मुलांची मानसिक एकाग्रता, स्मरणशक्ती व निर्णयक्षमता विकसित करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत असून, सांघिक खेळ, बौद्धिक उपक्रम आणि विविध क्रियाकलापांमुळे मुलांचा सहभाग अधिक सक्रिय होत आहे. विशेष म्हणजे, अंतर्ज्ञान विकसित करण्यासाठी डोळ्यांवर पट्टी बांधून वस्तू ओळखणे, फोटो मेमरी वाढवणे यांसारख्या प्रयोगात्मक सत्रांना मुलांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ज्यामुळे मुलांचा शैक्षणिक प्रगती चांगली होते

पालकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत असून, अशा आध्यात्मिक आधार असलेले शिबिर सुट्टीमध्ये वारंवार घ्यायला हवेत असे काही पालकांनी मनोगत व्यक्त केले, शिबिर पूर्ण केलेल्या मुलांमध्य चांगले बदल आत्मविश्वास वाढणे, मोबाईल स्क्रीन टाइम कमी होऊन आणि मुलांमध्ये सकारात्मक विचारसरणी विकसित होणे यासारखे बदल जाणवत असल्याचे मत काही पालकांनी व्यक्त करण्यात आले.

दिनांक ११ ते १४ एप्रिल दरम्यान सायंकाळी ४ ते ९ या वेळेत सुरू असलेले हे शिबिर अजूनही सुरू असून, पुढील काही सत्रे ऑनलाइन पद्धतीनेही आयोजित केली जाणार आहेत. आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याची भावना पालकांकडून व्यक्त होत आहे.

# समता बंधुता व शिक्षणाचा विचार तरुण पिढीने आत्मसात करावा – माजी उपसरपंच शंकरराव बर्वे

### वासुंदे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी दिलेला समता, बंधुता आणि शिक्षणाचा संदेश आजच्या तरुण पिढीने आत्मसात करणे काळाची गरज आहे. वासुंदे ग्रामस्थांच्या एकजुटीने असा सामाजिक सलोखा जपणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल. असे मत माजी उपसरपंच शंकरराव बर्वे यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वासुंदे ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात महामानवास अभिवादन करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी उपसरपंच शंकर बर्वे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक दत्तात्रय साळुंके, इंजि. निकील दाते, स्वप्नील झावरे, बापूसाहेब गायखे, इंजि. प्रसाद झावरे, अमोल साठे, किरण पोपळघट, सचिन वाबळे, अमोल पोटघन, संग्राम झावरे, समीर कंदलकर, संजय झावरे, अरुण वाबळे, प्रवीण झावरे, विशाल झावरे, भाऊसाहेब हिंगडे, विकासआण्णा झावरे, गणेश शिरतार, सिकंदर शेख, इंजि सागर साळुंके, मनोज झावरे, निलेश गायखे, दत्ता शिरतार, सुमित औटी, गणेश बर्वे, गणेश साळुंके, गणेश झावरे, अक्षय दाते, निलेश भालके सर, शरद सैद, सुरेश शिंदे भास्कर दाते, भाऊ साळुंके, अशोक चेमटे सर, संतोष झावरे, संदीप खंडाळे, सोमनाथ झावरे, रुपेश साठे, रामनाथ जगदाळे, अविनाश साळुंके, विनायक झावरे, ग्रामविकास अधिकारी भास्करराव लोंढे, तलाठी शिंदे भाऊसाहेब, आदित्य शिर्के, उद्योजक दादा तळेकर, शांताराम शिंदे,संदीप उर्फ नामा दाते, किरण गायखे आदी वासुंदे येथील ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. प्रसाद झावरे यांनी केले तर आभार अमोल साठे यांनी मानले. : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हीच खऱ्या अर्थाने समाजाची शक्ती आहे. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्याला हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून दिली. वासुंदे येथील ही जयंती म्हणजे केवळ सोहळा नसून, त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प आहे. तरुणांनी शिक्षणाद्वारे स्वतःची आणि गावाची प्रगती साधायला हवी. अमोल साठे (आंबेडकरी अनुयायी)

(पान १ वरून)

## संविधानाच्या विचारांतून समाजाला दिशा - आमदार संग्राम जगताप

पाहिजेत संघटित झाला पाहिजे संघटित झाला पाहिजे त्या माध्यमातून त्या माध्यमातून समाज समाज प्रगत प्रगत झाला झाला त्यांचे विचार समाजाला त्यांचे विचार समाजाला ऊर्जा व प्रेरणा देणारे ठरले असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, जल अभियंता परिमल निकम, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेश बनसोडे, मयूर बांगरे, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, उपायुक्त मेहेर लहारे, माजी नगरसेवक मनीष साठे, प्रा. माणिकराव विधाते, जयंत गायकवाड, वाल्मीक कुलकर्णी, प्रिया जानवे, रेश्माताई आठरे, सविता मोरे आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, ‘‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ज्ञान हे प्रगतीचे शस्त्र आहे.’’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच सर्वसामान्यांना हक्क मिळाले असून मी स्वतः महापौर पदापर्यंत पोहोचण्याचे श्रेय संविधानालाच देते. ‘‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’’ या त्यांच्या संदेशामुळे समाजाची प्रगती झाली आहे, असे त्या म्हणाल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी घेतलेले शिक्षण, मिळवलेल्या पदव्या आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांतून समाजाला दिशा मिळते. त्यांनी दिलेला संदेश कृतीतून आणि साहित्याद्वारे पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे. जयंती मिरवणुका उत्साहात साजऱ्या कराव्यात, मात्र डीजे, प्लाझ्मा व लेझर लाईटचा वापर टाळून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले कायदे व संविधान हे सर्वांसाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजासाठी कार्य करणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या माध्यमातून हे विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील विद्यार्थ्यांनी संविधानाचे वाचन केले. तसेच पोलीस बँड पथकाच्या वतीने मानवंदना देत कार्यक्रमाला उत्साही वातावरण लाभले.

## भीमराव माझा झाला पहिला बॅरिस्टर; बौद्ध संस्कार संघाची भीमपहाट रंगली

अहिल्यानगरचे सुप्रसिद्ध गायक अतुल थोरात यांनी ‘जय भीमवाले आले’ ही गीते सादर करत महाकवी वामनदादा कर्डक यांच्या रचनांना उजाळा दिला. महाराष्ट्रातील गायक नरेश बडेकर यांनी ‘पहाट झाली प्रभा म्हणाली भीम जयंती आली’, ‘राजा-राणीच्या जोडीला’ ही गीते सादर केली. तसेच शाहीर वसंत डंबाळे यांनी ‘भीमा तुझ्या महुला जाऊन काल मी आलो’ हे गीत सादर केले. गायिका आशा वडागळे आणि पल्लवी बोरुडे यांनीही आपल्या सादरीकरणाने रंगत वाढवली. साऊंड इंजिनियर शुभम नेटके यांनी ध्वनी संयोजनाची जबाबदारी सांभाळली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे, स्मिता मनोरंजन रूपवते आणि डॉ. तारकेश्वर वानखेडे यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान गुलाबराव खरात (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा), अभियंता पी. बी. गायसमुद्रे (जिल्हा जलसंधारण अधिकारी), भारती सागरे (उपजिल्हाधिकारी, बीड), आणि भाऊसाहेब सोनवणे (कृषी मंडळ अधिकारी बीड ) , इंजिनीयर किरण साळवे (सहाय्यक अभियंता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या भीमपहाट मैफिलीला अवालवृद्धांची मोठी उपस्थिती होती. अनेकांनी टाळ्यांच्या ठेक्यावर साथ देत वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमासाठी कीबोर्ड वादक नरेंद्र (सोनू) साळवे, ढोलक वादक निलेश उजागरे आणि ऑक्टोपॅडवर अभिनय कसबेकर यांनी साथसंगत केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक भाऊसाहेब देठे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध प्रायोजकांचे सहकार्य लाभले.

शेवटी, ‘‘यावेळी मोठ्या संख्येने आंबेडकरप्रेमी उपस्थित होते,’’ अशी माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय साबळे आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर यांनी केले.

## भारतीय बौद्ध महासभेच्या समता सैनिक दलाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास मानवंदना

आली. यावेळी त्रिसरण, पंचशील, भीमस्मरण व भीमस्तुती घेण्यात आली.

समता सैनिक दलाचे मेजर बाळू कांबळे, कंपनी कमांडर दिपक पाटोळे व गौतम हंबर्डे, संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव किशोर कांबळे व गोरख केदारे यांच्या नेतृत्वाखाली जनरल सलामी देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्हा दक्षिणचे जिल्हाध्यक्ष आयुष्यमान राजेंद्र साळवे, उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड, सचिव रवींद्र कांबळे, तसेच गौतम पाचारणे, राहुल कांबळे उपस्थित होते. शहर शाखेतील युवराज बनसोड, चंद्रकांत सरोदे, राजेंद्र पाडळे, विजय पाटोळे, रवींद्र घोडके, नरेश खडसे, दीपक गायकवाड, लक्ष्मण माघाडे आदींसह तालुका शाखेतील बौद्धाचार्य प्रकाश कांबळे, अविनाश राक्षे, अमोल गायकवाड, परमेश्वर गायकवाड, संजय गायकवाड, विजयकुमार ठोंबे, अंकुश गायकवाड, मदन पवार, अविनाश गायकवाड, विशाल गायकवाड, सनी गायकवाड, अमोल मोहन गायकवाड, रवींद्र गायकवाड, दादाराव गायकवाड, अशोक गायकवाड आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शहराध्यक्ष दिपक पाटोळे म्हणाले की, ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी केलेले महान कार्य आणि त्यांचा असीम त्याग यामुळेच भारत एकसंघ राहिला आहे.’’ मेजर बाळू कांबळे यांनी सांगितले की, ‘‘समाजामध्ये सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी समता सैनिक दलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, दलाचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात अधिकाधिक सैनिक तयार करून बाबासाहेबांचे सामाजिक समतेचे स्वप्न साकार करण्यात येईल.’’ कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एकमेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## पारनेर दूध संघाला हायटेक झळाळी; अत्याधुनिक यंत्रणेसाठी एक कोटींचा निधी

संगणक प्रणाली आणि दूध साठवणुकीसाठी मोठ्या टाक्यांची उभारणी करण्यात येणार आहे. आधुनिक यंत्रसामग्रीमुळे शेतकऱ्यांकडून संकलित होणाऱ्या दुधाची गुणवत्ता तपासणी अधिक अचूक होईल, ज्याचा थेट फायदा उत्पादकांना योग्य दर मिळण्यासाठी होणार आहे. तसेच, साठवण क्षमता वाढल्याने दुधाची नासाडी थांबून संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी युवा नेते राहुल शिंदे, भाजप नेते विश्वनाथ कोरडे, माजी सभापती गणेश शेळके, दूध संघाचे अध्यक्ष संदीप ठुबे, उपाध्यक्ष कल्याण काळे यांसह ज्येष्ठ नेते रामचंद्र मांडगे, दत्तानाना पवार, दादाभाऊ वारे, बाबासाहेब खिलारी, सुनील पवार, संग्राम पावडे आणि सुखदेव पवार यांसारखे मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या निधीमुळे पारनेर तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, यामुळे दूध संघाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होणार आहे.

## प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांचे स्वागत

उपलब्ध व्हावा, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात न्यायव्यवस्थेतील कामकाज अधिक प्रभावी आणि सुलभ व्हावे, तसेच न्यायालयीन प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग वाढावा, यासाठी बेंच आणि बार यामध्ये समन्वय साधला जात असल्याचे उपस्थित वकिलांनी सांगितले.